लोणार येथे योग महोत्सवाचे केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव >>पान 2

राज्यात पेट्रोलियम पदार्थांचा पुरेसा साठा >>पान 3

अपूर्ण जलजीवन योजना ‘पूर्ण’ दाखवण्याचा प्रकार उघड! >>पान 4

**सुविचार**

ध्येयाचा ध्यास लाभला म्हणजे कामाचा त्रास वाटत नाही.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 239 ■ बुधवार, दि. 08 एप्रिल 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




अमिताभ बच्चननं कल्की २चं शूटिंग केलं सुरू, फोटो व्हायरल

आतील पान

## भीम वकानी यांचे निधन

अहमदाबाद : टेलिव्हिजनवरील सर्वात लोकप्रिय मालिका 'तारक मेहता का उल्टा चश्मा' मधील दयाबेनच्या भूमिकेसाठी ओळखली जाणारी प्रसिद्ध अभिनेत्री दिशा वकानी हिला तिच्या कुटुंबाकडून एक अत्यंत दुःखद बातमी मिळाली आहे. दिशा वकानीचे वडील आणि ज्येष्ठ अभिनेते भीम वकानी यांचे अहमदाबादमध्ये निधन झाले आहे. ते काही दिवसांपासून आजारी होते. भीम वकानी हे केवळ एक उत्कृष्ट अभिनेतेच नव्हते, तर त्यांनी आपली मुलगी दिशा आणि सुंदरलालची भूमिका साकारणारा मुलगा मयूर वकानी यांच्या कारकिर्दीला आकार देण्यातही महत्त्वाची भूमिका बजावली होती.

## श्रीनगरमध्ये पाच जणांना अटक

श्रीनगर : श्रीनगर पोलिसांनी मोठी कारवाई करत बंदी घालण्यात आलेल्या दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबाशी संबंधित एका आंतरराज्यीय दहशतवादी मॉड्यूलचा भंडाफोड केला आहे. या ऑपरेशनदरम्यान दोन पाकिस्तानी दहशतवाद्यांसह एकूण पाच जणांना अटक करण्यात आली आहे. श्रीनगरमधून अब्दुल्ला उर्फ अबू हुरैरा याच्यासह पाच जणांना अटक करण्यात आली आहे. अब्दुल्ला हा गेल्या १६ वर्षांपासून फरार होता. जम्मू-काश्मीरच्या बाहेर लष्कर-ए-तैयबाची ठिकाणे उभारण्यात तो यशस्वी झाला होता. पोलिसांनी सांगितले की, अब्दुल्लासोबतच पाकिस्तानी दहशतवादी उस्मान उर्फ खुबैब यालाही या मोठ्या कारवाईत अटक करण्यात आली आहे. या मोठ्या कारवाईत जम्मू-काश्मीर पोलिसांसोबत केंद्रीय यंत्रणांनीही सहभाग घेतला. तपास यंत्रणांनी जम्मू-काश्मीर, राजस्थान आणि हरियाणा यांसह १९ ठिकाणी छापे टाकले असून आक्षेपार्ह साहित्य जप्त करण्यात आले आहे.

## महिलेची फसवणूक

पुणे : ऑनलाईन मॅट्रिमोनियल साइटवरून सुरू झालेली ओळख किती धोकादायक वळण घेऊ शकते, याचे जिवंत उदाहरण पुण्यात समोर आले आहे. शादी डॉट कॉमवर ओळख झालेल्या एका व्यक्तीच्या प्रेमात पडून इंदोरहून पुण्यात आलेल्या ४२ वर्षीय पीडितेची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार हडपसर परिसरात उघडकीस आला आहे.




# इराणमध्ये वास्तव्यास असलेल्या भारतीयांसाठी सूचना!

**दैनिक आपला विदर्भ**

नवी दिल्ली- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर संभाव्य हल्ला करण्यासाठी निश्चित केलेली मुदत जवळ येत असल्याने या परिस्थितीबाबतच्या जागतिक चिंता अधिकच तीव्र वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर भारताने सध्या इराणमध्ये वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांसाठी एक सूचना जारी केलीय. या सूचनेनुसार, जे भारतीय नागरिक अजूनही इराणमध्ये आहेत, त्यांनी पुढील ४८ तास ते ज्या ठिकाणी आहेत, तिथेच थांबून राहावे. त्यांना सर्व वीज केंद्रे आणि लष्करी तळांपासून दूर राहण्याचा सल्ला देण्यात आलाय. याव्यतिरिक्त त्यांनी बहुमजली इमारतींच्या वरच्या मजल्यांवर जाणे टाळावे, घराच्या आतच राहावे आणि महामार्गांवरून प्रवास करण्याबाबत भारतीय दूतावासाशी काटेकोरपणे समन्वय साधावा, असंही सांगितलं गेलंय.

दूतावासाशी नियमित संपर्क ठेवा : सरकारने स्पष्ट केले आहे की, दूतावासाने आरक्षित केलेल्या



हॉटेल्समध्ये वास्तव्यास असलेल्या नागरिकांनी हॉटेलच्या आवारातच राहावे आणि तिथे उपस्थित असलेल्या दूतावासाच्या पथकांशी नियमित संपर्क ठेवावा. सर्वांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी अधिकृत माहितीवर बारकाईने लक्ष ठेवावे.

**वीज केंद्रे आणि लष्करी तळांपासून अंतर राखा**

या संदेशात भारतीय नागरिकांना कोणत्याही विद्युत केंद्रांच्या, वीज प्रकल्पांच्या, लष्करी तळांच्या किंवा सरकारी इमारतींच्या जवळ न जाण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आलेत. हे निर्देश अत्यंत महत्त्वाचे आहेत, कारण कोणत्याही हल्ल्याच्या प्रसंगी ही ठिकाणे प्राथमिक लक्ष्य बनू शकतात.

**वरचे मजले टाळा**

सुरक्षेच्या कारणास्तव नागरिकांना बहुमजली इमारतींचे वरचे मजले रिकामे करून त्याऐवजी खालच्या मजल्यांवर राहण्याचा सल्ला देण्यात आलाय. संभाव्य हवाई हल्ल्यांची शक्यता लक्षात घेऊन सावधगिरीचा उपाय म्हणून ही खबरदारी अनेकदा घेतली जाते.

**महामार्गावरील हालचालींवर निर्बंध**

जर अपरिहार्य परिस्थितीमुळे कोणाला महामार्गावर प्रवास करणे भाग पडले, तर त्यांनी भारतीय दूतावासाशी समन्वय साधणे अनिवार्य आहे. पूर्वसूचना न देता रस्त्याने प्रवास करणे अत्यंत धोकादायक ठरू शकते.

**दूतावासाकडून हॉटेल्समधील सुरक्षा निश्चित**

दूतावासाने करार केलेल्या हॉटेल्समध्ये वास्तव्यास असलेल्या नागरिकांना हॉटेलच्या आवारातच राहण्याचे आणि तिथे उपस्थित असलेल्या दूतावासाच्या पथकाशी सतत संपर्कात राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# पुढील ४८ तास सावध राहा; हेल्पलाइन नंबरही जारी

**संकटाच्या प्रसंगी त्वरित येथे संपर्क साधा**

नागरिकांना सहाय्य करण्यासाठी भारतीय दूतावासाने अनेक मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी जारी केले आहेत; हे संपर्क माध्यम २४ तास कार्यरत आहेत.

मोबाईल क्रमांक :
+989128109115, +989128109109,
+989128109102, +989932179359
ईमेल : cons.tehran@mea.gov.in

**ही सूचना का जारी करण्यात आली?**

इराणमधील परिस्थिती सध्या अस्थिर आणि तणावपूर्ण आहे. एका बाजूला इराणचे राष्ट्राध्यक्ष पेझेश्कियन आणि तेथील शक्तिशाली लष्करी दल यांच्यात अंतर्गत मतभेद असल्याचे अहवाल येत आहेत; तर दुसऱ्या बाजूला इस्रायल आणि अमेरिकेकडून डागल्या जाणाऱ्या क्षेपणास्त्रांद्वारे इराणची अणुऊर्जा केंद्रे आणि वीज प्रकल्पांना लक्ष्य केले जाण्याचा धोका निर्माण झालाय. इराणने आपल्या नागरिकांना मानवी साखळ्या तयार करण्याचे आवाहन केल्याच्या पार्श्वभूमीवर कोणताही भारतीय नागरिक अनावधानाने कोणत्याही संघर्षात अडकू नये किंवा एखाद्या हल्ल्यादरम्यान गोळीबाराच्या टप्प्यात येऊ नये, याची खात्री करण्यास भारत सरकार उत्सुक आहे.

# मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार!

## रॉकेट हल्ल्यात २ चिमुकल्यांचा मृत्यू; बीएसएफ जवानाची पत्नी गंभीर जखमी

### पाच जिल्ह्यांत इंटरनेट बंदीसह कर्फ्यू



**मुंबई। प्रतिनिधी :** ईशान्य भारतातील मणिपूर राज्यात पुन्हा एकदा हिंसा भडकली आहे. मणिपूरमधील बिष्णूपूर जिल्ह्यात मंगळवारी एका रॉकेटसारख्या वस्तूने एका घरावर हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात दोन लहान मुलांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर जिल्ह्यात हिंसाचार उसळला. अनेकठिकाणी तीव्र निदर्शने सुरू झाली. यानंतर सीआरपीएफने केलेल्या गोळीबारात दोन नागरिक ठार झाले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

मोइरांग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ट्रोंगलाओबी अवांग लेकाई या गावात पहाटेच्या वेळीसीमा सुरक्षा दलातील एका जवानाच्या घरावर रॉकेट हल्ला झाला. या स्फोटात मुलांची आई गंभीर जखमी झाली असून तिच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पहाटे १ वाजण्याच्या सुमारास हल्ला झाला. संशयित अतिरेक्यांनी घरावर स्फोटके फेकल्यामुळे घरात झोपेत असलेल्या चार वर्षांच्या मुलाचा आणि त्याच्या नवजात बहिणीचा मृत्यू झाल्याचा आरोप मुलांच्या आजीने केला.

# भोंदू खरातविरोधात ठोस पुरावे

## ४६५० लिंक्स हटविल्या

## एसआयटी प्रमुख तेजस्विनी सातपुते यांनी दिली तपासातील मोठी अपडेट

## पीडितांची ओळख उघड न करण्याचे आवाहन

**नाशिक । प्रतिनिधी :** भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणी पोलीस सखोल तपास करत आहेत. त्याने पीडित महिलांचे धमकी देवून शोषण केल आहे. त्याच्यावर एकूण १२ गुन्हे दाखल आहेत. आम्ही सखोल तपास करत आहोत. या प्रकरणी पीडित महिलांनी धाडसाने फिर्याद दिली आहे. आता सर्वांचीच पीडितांच्या खासगी आयुष्य जपण्याची जबबादारी आहे. या प्रकरणी राज्य पोलीस ईडी सहकार्य करत आहे. एकुणच न्यायालयाच्या आदेशानुसारच या प्रकरणी अधिक खुलासा करता येणार नाही, असे विशेष तपास पथकाच्या प्रमुख तेजस्विनी सातपुते यांनी आज (दि. ७) पत्रकार परिषद स्पष्ट केले.

तेजस्विनी सातपुते यांनी सांगितले की, अशोक खरात याच्याविरोधात नाशिक आणि नगर मध्ये एकूण १२ गुन्हे दाखल आहे. एसआयटीकडे असलेल्या गुन्ह्यांपैकी ८ गुन्हे महिला लैंगिक, तीन गुन्हे फसवणूक, सावकरी आणि अंधश्रद्धेशी संबंधित आहेत. महिला लैंगिक अत्याचाराचे आठ गुन्हे आणि फसवणुकीचा एक गुन्हा असे ९ गुन्हे आहेत. या प्रकरणी एसआयटीने एकूण ३० साक्षीदार तपासले आहेत. खरात पीडित महिला आणि त्यांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेत



होता. स्वतःकडे दैवी शक्ती असल्याचा भासवत होता. अंधश्रद्धा पसरविण्याचा काम करत होता. खडे, चिंचोके इत्यादी गोष्टीद्वारे तो पैसा उकळत होता. महिलांना कुटुंबीयांच्या मृत्यूची भीती दाखवून, त्यांना बदनामीची धमकी देऊन लैंगिक शोषण करत होता. ईशान्यश्वर मंदिराच्या परिसरात अंधारात दैवी शक्ती असल्याचं भासवून अंधश्रद्धा पसरवत होता, असेही तपासात निष्पण झाल्याचे सातपुते यांनी स्पष्ट केले. भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणी पीडित महिला आणि कुटुंब धाडसाने पुढे आले आहे. लोक काय म्हणतील याकडे दुर्लक्ष करत पीडित महिलांनी फिर्याद दिली आहे. पीडित महिलांची ओळख पटू नये, गोपनीय ठेवणे महत्वाचे आहे. त्यांचे महिलांचे धैर्य टिकून राहण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यामुळे पोलिसांच्या पत्रकार परिषदेला बंधने आहेत, असेही सातपुते यांनी स्पष्ट केले.

अशा संवेदनशील प्रकरणांमध्ये न्यायालयाचे काही आदेश आहेत. तर्क वितर्क आधारे वार्तांकन टाळावे असे ही आदेश आहे. महिलांची ओळख पटविल्यास गुन्हा आहे. मद्रास न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार, पीडित महिलांचे फोटो आणि लिंक्स सायबर टीमने डिलीट केल्या आहेत. आक्षेपार्ह पोस्ट प्रकरणी ४५१ अकाउंट थेट बंद केले आहेत. तसेच बदनामी कारक पोस्ट डिलीट केल्या आहेत, अशीही माहिती सातपुते यांनी यावेळी दिली.

या प्रकरणी ६० दिवसांच्या आत दोषारोपपत्र दाखल करायचे आहेत. पहिल्या गुन्ह्यात आता ४० दिवस शिल्लक आहेत, इतर गुन्ह्यांची डेडलाईन जवळ आहे. ठोस पुरावे गोळा करून तपास सुरु आहे. फिर्यादी आणि साक्षीदार जे सांगतात त्यानुसार तपास केला जातो. गुन्ह्यांची पार्श्वभूमीवर बघता कुणी मदत केली असेल तर कारवाई केली जाईल. आमचा अजूनही तपास सुरू आहे. या प्रकरणी दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत गोपनीयता बाळगली जाणार आहे, असे स्पष्ट करत अशोक खरातला दुसऱ्या गुन्ह्यात अटक केली असून बुधवारपर्यंत तो पोलीस कोठीडत आहे. पुढील गुन्ह्यांत आम्ही कोठडी मागणार आहेत. काही कारणास्तव आम्ही व्हीसीद्वारे आरोपीला हजर करत आहे. या प्रकरणात ईडीने माहिती मागितली ती दिली आहे यापुढेही सहकार्य राहील, असेही तेजस्विनी सातपुते यांनी स्पष्ट केले. या प्रकरणी दोषारोपपत्र दाखल होत नाही तोपर्यंत सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही तेजस्विनी सातपुते यांनी केले.

# ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ राज्यव्यापी अभियानाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

## उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्र्यासह मंत्रिमंडळाची उपस्थिती

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई। प्रतिनिधी :** जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या “माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव” या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. अभियानाविषयी माहिती देण्यात येणाऱ्या व्हिडिओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

राज्य शासनाने ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. लोकसहभागातून ही मोहीम व्यापक आरोग्य चळवळ म्हणून उभी राहावी, हा शासनाचा मानस असून, गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर अधिक भर देणे. स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण, तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण यासारख्या मूलभूत घटकांवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. माता-बाल आरोग्य, मानसिक आरोग्य आणि बदलत्या जीवनशैलीशी निगडित आजारांनाही या मोहिमेत विशेष स्थान देण्यात आले आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली असून, ठरावीक निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना “आरोग्यसंपन्न गाव” म्हणून गौरविण्यात येणार आहे. यासाठी



राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असून, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच आरोग्य संस्थांना ६५.२५ कोटी रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

“माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव” हे अभियान केवळ योजना नसून एक लोकचळवळ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्याचा स्तर उंचावून निरोगी, सशक्त आणि समृद्ध समाज घडविण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचा विश्वास यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

## नवीन विषयाचे भांडवल..

निवडणुकांचा हंगाम जवळ आला की, भारतीय राजकारणात आरोप-प्रत्यारोपांचे तापमान वाढते आणि वास्तवापेक्षा संशय अधिक मोठा होतो. अशा वेळी जबाबदारीने बोलण्याऐवजी भीती पसरवली, तर लोकशाहीचाच तोटा होतो. अशी नवीन तुणतुणी वाजवण्यात राहुल गांधी पटाईत असून, सध्या 'डेटा' नावाचे नवे तुणतुणे त्यांना गवसले आहे. भारत-अमेरिका व्यापार करार आणि डेटा सार्वभौमत्व' या विषयावर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अलीकडे केलेले विधान याच प्रवृत्तीचे उदाहरण आहे. भारतीयांचा आरोग्य, आर्थिक आणि वैयक्तिक डेटा अमेरिकेला विकला जाणार का? असा प्रश्न विचारताना त्यांचा आविर्भाव असा आहे की, जणूकाही हा करार अंतिम झाला आहे आणि त्यातून भारताचा डेटा बाहेर जाणार आहे. प्रत्यक्षात मात्र, भारत-अमेरिका यांच्यात असा कोणताही अंतिम व्यापार करार झालेला नाही. त्यामुळे 'डेटा ट्रान्सफर'चा प्रश्न उपस्थित होणेच चुकीच्या गृहीतकावर आधारित ठरते. हा सरळसरळ अपप्रचार आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. राजकारणात प्रश्न विचारणे आवश्यक असते; पण प्रश्नांची पायाभरणी तथ्यांवर असावी लागते, अन्यथा ते भीती पसरवण्याचे साधन ठरतात. राहुल गांधींच्या विधानात हीच समस्या दिसते. व्यापार करार नसताना त्यातून 'डेटा-विक्री'चा धोका दाखवणे म्हणजे, 'नॅरेटिव्ह बिल्डिंग'चा भाग असून, यात संशयाला अधिक महत्त्व दिले जाते. यातला विरोधाभास अधिक ठळक होतो, तो राहुल गांधींच्याच पूर्वीच्या भूमिकेमुळे. लोकसभेत 'डेटा' विषयावर बोलताना त्यांनी 'डेटा इज द न्यू ऑईल' असे स्पष्टपणे म्हटले होते. जागतिक अर्थव्यवस्थेत डेटा ही मौल्यवान संपत्ती असण्यावरही त्यांनी भर दिला होता. मग आज तोच डेटा अचानक विकला जाणार असल्याचा दावा करणे, हे भूमिकेतील विसंगती दर्शवणारे ठरते. राहुल गांधींच्या राजकीय कारकिदत अशा प्रकारच्या बेताल आणि बिनबुडाच्या आरोपांची ही काही पहिलीच वेळ नाही. 'राफेल' कराराच्या वेळी 'चौकीदार चोर हैं', असा नारा देत, त्यांनी सरकारवर गंभीर आरोप केले होते. परंतु, सर्वोच्च न्यायालयापासून नियंत्रक आणि महालेखापरीक्षकापर्यंत सर्व संस्थांनी ते फेटाळले. 'पेगासस' प्रकरणातही भारतात मोठ्या प्रमाणावर 'फोन हॅकिंग' झाल्याचा आरोप करण्यात आला; पण त्याचेही ठोस पुरावे सादर झाले नाहीत. 'ऑपरेशन सिंदूर'सारख्या राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित विषयांवरही त्यांनी शंका उपस्थित केल्या, ज्यामुळे देशाच्या प्रतिमेवर परिणाम झाला. या पार्श्वभूमीवर, 'डेटा सार्वभौमत्वा'सारख्या विषयावर निर्माण केलेली भीती ही अधिक गंभीर ठरते. कारण, डेटा हा आता प्रत्येक नागरिकाच्या जीवनाशी निगडित विषय आहे. बँकिंग, आरोग्य, शिक्षण, सोशल मीडिया अशा सर्व क्षेत्रांत डेटा हा केंद्रस्थानी आहे. त्यामुळे मोदी सरकार तुमचा डेटा विकणार आहे, अशा केल्या गेलेल्या अपप्रचाराचा थेट परिणाम सामान्य नागरिकांच्या मनावर होतो. हीच बाब लक्षात घेऊन हा मुद्दा निवडणुकांच्या तोंडावर पुढे आणला गेला, असे निश्चितपणे म्हणता येते. मात्र, 'अपप्रचाराचा प्रभाव काहीकाळ टिकू शकतो; पण तो कायमस्वरूपी राहत नाही', असे अब्राहम लिंकन यांनी म्हटले होते, त्याचे यानिमित्ताने स्मरण होते. भारतीय न्यायव्यवस्थेनेही डेटा आणि गोपनीयतेच्या प्रश्नावर स्पष्ट भूमिका घेतली आहे. सर्वोच्च न्यायालयाने गोपनीयतेचा अधिकार हा घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांशी संबंधित असल्याचे ठामपणे सांगितले. अशा परिस्थितीत कोणतेही सरकार नागरिकांचा डेटा 'विकेल' असा आरोप करणे हे घटनात्मक वास्तवाकडेही दुर्लक्ष करणारे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही अनेकदा स्पष्ट केले आहे की, डेटा हा सशक्तीकरणासाठी वापरायचा आहे, शोषणासाठी नव्हे. 'डिजिटल इंडिया'च्या माध्यमातून सरकारने डेटा-आधारित सेवा नागरिकांपर्यंत पोहोचवल्या. 'यूपीआय', 'आधार'-आधारित सेवा, 'डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर' यांसारख्या उपक्रमांनी पारदर्शकता वाढवली. हे सर्व पाहता, डेटा-विक्रीचा आरोप वास्तवाशी विसंगत ठरतो. जगभरात डेटा हा नव्या अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू बनत आहे. 'नीती आयोगा'नेही स्पष्टपणे नमूद केले आहे की, भारताची डिजिटल अर्थव्यवस्था तीन ट्रिलियन डॉलरची होणार आहे. अशा परिस्थितीत 'डेटा संरक्षण' आणि त्याचा सुयोग्य वापर हे सरकारचे प्राधान्य असणे स्वाभाविकच आहे. त्यामुळेच 'डेटा लोकलायझेशन', 'डेटा सेंटर'ची उभारणी आणि 'डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट' यांसारखे निर्णय घेण्यात आले. यासंदर्भात एक उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. काही वर्षांपूव एका मोठ्या सोशल मीडिया कंपनीने भारतीय वापरकर्त्यांचा डेटा परदेशात साठवण्याचा प्रयत्न केला होता. सरकारने त्याला आक्षेप घेत, डेटा भारतातच साठवण्याचे निर्देश दिले. यामुळे केवळ डेटाच सुरक्षित झाला नाही, तर भारतात 'डेटा सेंटर' उद्योगालाही चालना मिळाली. युरोपमध्येही डेटा संरक्षणाला अत्यंत महत्त्व दिले जाते, भारताची वाटचालही याच दिशेने आहे. डेटा हा आता प्रत्येक नागरिकाच्या आयुष्याशी थेट जोडलेला विषय आहे. बँकिंग, आरोग्य, शिक्षण सर्वत्र डेटा वापरला जातो. त्यामुळे सरकार तुमचा डेटा विकणार आहे, अशी भीती निर्माण करणे हा निव्वळ राजकीय खेळ. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा पुढे आणण्यामागे मतदारांच्या मनात संशय निर्माण करण्याचा हेतू स्पष्ट दिसतो. याउलट, काँग्रेसच्या कारभारात डेटा वापराबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झालेले आहेत. २०२४च्या निवडणुकांदरम्यान महिलांना 'गॅरंटी कार्ड' देत, त्यांच्या वैयक्तिक माहितीचे संकलन करण्यात आले. उत्तर प्रदेश आणि बंगळुरूतील घटनांमध्ये महिलांनी मोठ्या प्रमाणावर गद केल्याचे चित्र दिसले. नंतर आश्वासने पूर्ण न झाल्याने नाराजी व्यक्त झाली. या घटनांमुळे डेटा संकलनाचा वापर राजकीय फायद्यासाठी झाला का? हा प्रश्न निर्माण होतो. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही डेटा हा अत्यंत संवेदनशील विषय. कोणतेही जबाबदार सरकार डेटा-सुरक्षेला प्राधान्य देणारच. भारताने अमेरिकेसोबतच्या चर्चेतही आपले हित जपण्यासाठी ठाम भूमिका घेतली आहे. काही अटी मान्य न केल्यामुळेच करार पुढे ढकलला गेला. यावरून स्पष्ट होते की, भारत कोणत्याही बाह्य दबावाखाली निर्णय घेत नाही. त्यामुळे मोदी हे ट्रम्प यांच्या प्रभावाखाली काम करतात हा आरोप देशाच्या परराष्ट्र धोरणावरच प्रश्नचिन्ह उभे करणारा आहे. लोकशाहीत विरोधकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. परंतु, ती भूमिका जबाबदारीची असावी लागते. तथ्यांवर आधारित टीका लोकशाहीला बळकटी देते, तर अपप्रचार तिचे नुकसान करतो. राहुल गांधींचे सध्याचे विधान हे दुसऱ्या प्रकारात मोडते. 'डेटा सार्वभौमत्वा'सारख्या गंभीर विषयावर राजकारण करण्याऐवजी, सर्व पक्षांनी एकत्र येऊन ठोस धोरणावर चर्चा करणे आवश्यक आहे, अन्यथा नवे तुणतुणे वाजवण्याच्या नादात सत्याचा आवाज मात्र दाबला जाईल.

# लोणार येथे योग महोत्सवाचे केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते उद्‌घाटन

## एकाच वेळी ६ हजार साधकांनी केला त्रिकोनासन: एशियन बुक ऑफ इंडीया मध्ये नोंद








दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** योग हा केवळ शारीरिक व्यायाम नाही. योग ही एक समग्र जीवनशैली आहे जी शरीर, मन आणि आत्मा यांच्यात संतुलन निर्माण करते. योग आपल्याला मानसिक शांती, शारीरिक सुदृढता आणि सकारात्मक जीवनदृष्टी देतो. आजच्या वेगवान आणि तणावपूर्ण जीवनशैलीत योगाचे महत्त्व अधिकच वाढले आहे, असे प्रतिपादन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले

आंतरराष्ट्रीय योग दिनाला ७५ दिवस शिल्लक असताना योगाचा प्रचार प्रसार व्हावा, या दृष्टिकोनातून केंद्रीय आयुष्य बुलढाणा जिल्ह्यातील जगप्रसिद्ध लोणार सरोवराच्या काठावर करण्यात आले होते. या योग महोत्सवाचे उद्धाटन केंद्रीय आयुष्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते आज सकाळी झाले. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी आयुष विभागाच्या सहसचिव मोनालिसा दास, जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे, जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्यासह माजी आमदार संजय रायमुलकर, राजश्री प्रतापराव जाधव, आयुक्त रमेश चौहाण, मोरारजी देसाई संस्थाचे डॉ. काशिनाथ, नगराध्यक्ष, लोणार मीराताई भूषण मापारी, प्रकाश जी मापारी, बळीरामजी मापारी, आंतरराष्ट्रीय नॅचरोपॅथी संघटनाचे अनंत बिरादार, उपस्थित होते.


प्रतापराव जाधाव म्हणाले की, आज जगासमोर असलेल्या गैर-संचारी रोगांच्या वाढत्या आव्हानाला तोंड देण्यासाठी योग अत्यंत प्रभावी उपाय ठरू शकतो. नियमित योगाभ्यास, प्राणायाम आणि ध्यान यामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा आणि तणाव यांसारख्या अनेक समस्यांवर नियंत्रण मिळवता येते, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

Asia Book of Records' आणि 'India Book of Records 2026' मध्ये अधिकृतपणे नोंद

पंतप्रधान श्री नरेन्द्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आज लोणारच्या ऐतिहासिक भूमीवर एक नवा कीर्तिमान प्रस्थापित झाला आहे. आंतरराष्ट्रीय योग दिवस २०२६ (२०२६) च्या १०० दिवसीय काउंटडाउनच्या ७५ व्या दिवशी आयोजित योग महोत्सवात ६ हजार योगसाधकांनी एकाच वेळी त्रिकोणासन चा अभ्यास केला. या गौरवशाली कामगिरीची Asia Book of Records' आणि 'India Book of Records 2026' मध्ये अधिकृतपणे नोंद करण्यात आली आहे.

हा विक्रम केवळ आपल्या योगशक्तीचे प्रतीक नाही, तर पंतप्रधान यांच्या स्वस्थ भारत, विकसित भारत हा संकल्प सिद्ध करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल असल्याचं मत केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केले. योग अभ्यासामधील त्रिकोणासनामध्ये एकाच वेळी सहा हजार लोकांनी योगासन केल्याप्रकरणी एशियन बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद झाली आहे, अशी घोषणाही यावेळी करण्यात आली. रेकॉर्डमध्ये नोंद झाल्याचे प्रमाणपत्र केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांना देण्यात आले.

# महाराष्ट्रात आता 'एआय'साठी स्वतंत्र मंत्रालयीन विभाग




**मुंबई। प्रतिनिधी :** राज्याच्या प्रशासनात आधुनिक तंत्रज्ञानाचा अंतर्भाव करण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी अनेक क्रांतिकारी निर्णयांवर शिक्कामोर्तब केले. त्यानुसार, आता 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (एआय) आणि माहिती तंत्रज्ञानासाठी स्वतंत्र मंत्रालयीन विभाग स्थापन करण्यात येणार असून, महावितरणची आर्थिक कोंडी फोडण्यासाठी तिची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील डिजिटल गव्हर्नन्सला गती देण्यासाठी सध्याच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे रूपांतर आता 'इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयात' केले जाणार आहे. विशेष म्हणजे, मंत्रालयीन विभाग, आयुक्तालय आणि सर्व जिल्ह्यांसाठी कायमस्वरूपी पदांचा समावेश असलेला स्वतंत्र 'आयटी संवर्ग' (आयटी केडर) निर्माण केला जाईल. यामुळे सरकारी कामकाजात एआय आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे शक्य होणार आहे.

राज्यातील वीज वितरण व्यवस्थेला शिस्त लावण्यासाठी महावितरणच्या आर्थिक पुनर्रचनेचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार, महावितरण कंपनी आता शेअर बाजारात (लिस्टिंग) नोंदणीकृत होणार आहे. शासन हमी असलेल्या ३२ हजार ६७९ कोटी रुपयांच्या कर्जासाठी भांडवली बाजारात सरकारी रोखे आणले जातील. कृषी वीज वितरण व्यवसायाचे स्वतंत्र विभाजन करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला, ज्यामुळे कृषी पंपांच्या वीज पुरवठ्याचे व्यवस्थापन अधिक सुलभ होईल.

नियोजन विभागांतर्गत कार्यरत असलेले 'महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर' (एमआरसॅक) आता सोसायटीऐवजी कंपनी (कलम ८ अंतर्गत) म्हणून काम करणार आहे. या बदलामुळे रस्ते माहिती प्रणाली, नगररचना, जलयुक्त शिवार, आणि खाणकामाच्या अभ्यासाला व्यावसायिक गती मिळेल. तसेच, भू-स्थानिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी 'म हाजिओटेक' ही नवीन कंपनी स्थापन करण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. याद्वारे विद्यार्थी आणि संशोधकांसाठी नवीन शैक्षणिक कार्यक्रम राबवले जातील.

'महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम' (एमआरडीपी) अंतर्गत आपत्ती व्यवस्थापनासाठी खासगी भांडवल आणि जागतिक बँकेकडून १६५ कोटींचा निधी उभारला जाणार आहे. आपत्तीग्रस्त नागरिकांना गृहकर्जात आणि लघु उद्योजकांना व्यवसायासाठी विशेष सवलती व विमा सुरक्षा दिली जाईल. कृष्णा खोऱ्यातील सांगली, कोल्हापूर आणि इचलकरंजी या शहरांम धील पुराचा धोका कमी करण्यासाठी प्रतिबंधक आराखडे तयार करण्यात येणार आहेत.

# बुलढाण्यात नूतन जिल्हाधिकाऱ्यांचे जल्लोषात स्वागत; डॉ. किरण पाटील यांना भावपूर्ण निरोप

## विकासकामे वेगाने पुढे नेण्याचा संकल्प-डॉ.प्रविणकुमार देवरे







दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात ६ एप्रिल रोजी मावळते जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला, तर नूतन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांचे प्रशासनाच्या वतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले. मावळत्या जिल्हाधिकाऱ्यांनी सुरू केलेली विकासकामे अधिक वेगाने पुढे नेण्याचा संकल्प डॉ. देवरे यांनी व्यक्त केला.

दिमाखदार सोहळ्यात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, अप्पर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, डॉ. पाटील यांच्या पत्नी शीला पाटील, तसेच सर्व उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, विविध विभागांचे विभाग प्रमुख व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नूतन जिल्हाधिकारी डॉ. देवरे यांनी यावेळी म्हणाले, बुलढाणा जिल्ह्यातील पूर्वीचा कामाचा अनुभव गाठीशी असल्याने मला येथील परिस्थितीची जाण आहे. आगामी काळात निर्यात, कृषी, शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांवर विशेष भर देऊन जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्याचा मानस आहे. डॉ. पाटील यांनी घडवलेली अधिकाऱ्यांची टीम जबरदस्त असून, त्यांच्या सहकार्याने विकासाचा ध्यास पूर्ण करू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मावळते जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी आपल्या निरोपपर भाषणात जिल्ह्यातील अधिकाऱ्यांच्या एकजुटीचे आणि कार्यपद्धतीचे कौतुक केले. ते म्हणाले आज महाराष्ट्रात बुलढाणा जिल्हा विकासकामांमध्ये अग्रेसर आहे, असे त्यांनी अभिमानाने सांगितले. अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी कामाचे नियोजन, पूर्वतयारी, पारदर्शकता आणि नियमित वृत्तपत्र वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. पशुसंवर्धन आयुक्तपदी पदोन्नतीबद्दल बोलताना, मुक्या प्राण्यांची सेवा ही पुण्याची बाब असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

डॉ. पाटील यांच्या कार्यकाळात जलयुक्त शिवार, महसूल सुधारणा, लोणार सरोवर संवर्धन आणि दस्तावेजांचे डिजिटायझेशन, महसूल मित्र, सुलभ चॅटबॉट सेवा, ई-महसूल, डॅशबोर्ड, सहज प्रणाली इ. सारख्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे जिल्ह्याने लक्षणीय प्रगती साधली आहे. स्वागत व निरोप सभारंभाला उपस्थितांनी डॉ. किरण पाटील यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देत नूतन जिल्हाधिकारी डॉ. देवरे यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन महसूल तहसीलदार वृषाली केसकर यांनी केले.

### डॉ. प्रविणकुमार पितांबर देवरे यांची उल्लेखनीय कारकीर्द

बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार पितांबर देवरे (IAS-2013) यांनी आपल्या प्रशासकीय सेवेत उल्लेखनीय कार्य करत राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या उल्लेखनीय कारकीर्दबाबतची माहिती याप्रमाणे:

डॉ. देवरे यांनी B.V.Sc. & A.H ही शैक्षणिक पात्रता प्राप्त करून २०१३ साली भारतीय प्रशासकीय सेवेत (IAS) प्रवेश केला. यापूर्वी ते आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, पुणे या पदावर कार्यरत होते.

डॉ. देवरे यांनी कारकीर्दीची सुरुवात १९९६ साली परीविक्षाधीन अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी, भंडारा येथे केली. त्यानंतर राजुरा (चंद्रपूर) व अकोला येथे उपविभागीय अधिकारी, बुलढाणा येथे निवासी उपजिल्हाधिकारी म्हणून २००४ ते २००७ या कालावधीत निवासी उपजिल्हाधिकारी होते. नाशिक येथे सहआयुक्त तर अहमदनगर येथे उपजिल्हाधिकारी म्हणून जबाबदारी यशस्वीपणे पार पाडल्या. तसेच सोलापूर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी, पुणे येथे अतिरिक्त आयुक्त, नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयात उपआयुक्त GAD) तसेच CVC पुणे येथे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी प्रभावी कामगिरी बजावली.

आयएएस अधिकारी म्हणून त्यांनी संचालक ओबीसी पुणे,CMD, MSWC पुणे व पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त या पदांवर कार्य करताना महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. डॉ. देवरे यांच्या नेतृत्वाखाली पशुसंवर्धन विभागाने Animal Husbandry Infrastructure Development Fund (AHIDF) योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र राज्याला प्रथम क्रमांक मिळवून दिला आहे. तसेच "२१ वी पशुगणना" निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नियोजन अधिकारी म्हणून काम केले असून, JNNURM अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ८००० घरांची उभारणी केली आहे. PMRDA क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजनेसाठी १ लाख घरांचे नियोजन करण्यातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. याशिवाय, आपत्ती व्यवस्थापनासाठी राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षक म्हणून त्यांनी कार्य केले असून, अहमदनगर व सोलापूर येथे राष्ट्रीय महामार्ग भूसंपादनासाठी मध्यस्थ म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमातील सर्व १८ तांत्रिक बाबींची पूर्तता त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तसेच विभागाच्या इतिहासात प्रथमच ACAHs व LDOs यांची समुपदेशनाद्वारे बदली प्रक्रिया राबविण्यात आली. अकोला येथे महसूल कामकाज व पूर व्यवस्थापनासाठी "सर्वोत्कृष्ट महसूल अधिकारी" पुरस्काराने २००४ मध्ये सन्मानित करण्यात आले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### युद्ध आणखी पेटणार? इस्रायलने दिला मोठा इशारा; सौदी-बहरैन पूल बंद

तेहरान : मध्य पूर्व आशियामधील युद्ध आता सहाव्या आठवड्यात पोहोचले असून परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच गंभीर होत आहे. ज्यावेळी हे युद्ध काही क्षणांत संपवू असे दावे डोनाल्ड ट्रम्प यांनी केले होते, त्याच संघर्षात ते आता अडकलेले दिसत आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला नव्याने इशारा देत स्पष्ट केले आहे की, ठरलेल्या वेळेत होर्मुज सामुद्रधुनी खुली केली नाही तर अमेरिका कठोर कारवाई करेल. गरज भासल्यास इराणच्या वीज प्रकल्पांवर आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर हल्ले केले जाऊ शकतात, अशीही चेतावणी त्यांनी दिली. यावर प्रत्युत्तर देताना इराणने ठाम भूमिका घेतली असून, युद्धातील नुकसानीची भरपाई मिळेपर्यंत होर्मुज खुली केली जाणार नाही, असे स्पष्ट केले आहे.

पाकिस्तानचा मध्यस्थीचा प्रयत्न :

दरम्यान, पाकिस्तानकडून मध्यस्थीचे प्रयत्न सुरू आहेत. इराणमध्ये कोसळलेल्या अमेरिकन लढाऊ विमानातील पायलटला म ोठ्या बचाव मोहिमेत सुरक्षित बाहेर काढण्यात आले. या कारवाईत कोणतीही अमेरिकन जीवितहानी झाली नाही, मात्र पायलट जखमी असल्याची माहिती देण्यात आली. त्याचवेळी अ-१० थंडरबोल्ट घ्घब हे विमान होर्मुजजवळ कोसळले, पण त्याचा पायलटही वाचवण्यात आला. आंतरराष्ट्रीय पातळीवरही हालचाली सुरू असून, ओमान इराणशी संवाद साधत आहे, तर पाकिस्तान आणि इजिप्त अमेरिका-इराण संवाद कायम ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत.

अशातच आता इस्रायलने मोठा इशारा दिला असून, सौदी अरेबिया आणि बहरीनला जोडणारा किंग फहद कॉजवे हा महत्त्वाचा पूल तात्पुरता बंद करण्यात आला आहे. इराणकडून संभाव्य हवाई हल्ल्यांच्या धमक्यांमुळे सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आला. वाढता तणाव लक्षात घेता पुलावरील वाहतूक थांबवण्यात आली आहे. हा पूल बहरीनसाठी अत्यंत महत्त्वाचा असून, तो सौदी अरेबियाशी असलेला एकमेव रस्तामार्ग आहे.

रेल्वे आणि संबंधित सुविधांचा वापर टाळण्याचे आवाहन :

तसेच, इस्रायल डिफफेन्स फोर्सेस यांनी इराणमधील नागरिकांना इशारा दिला आहे. त्यांनी लोकांना रेल्वे आणि संबंधित सुविधांचा वापर टाळण्याचे आवाहन केले आहे, कारण त्यांच्यावर हल्ल्याचा धोका असल्याचे सांगण्यात आले आहे. सोशल मीडिया प्लॅटफर्फॉर्मे वर जारी केलेल्या संदेशात, नागरिकांनी तातडीने रेल्वे प्रवास बंद करावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### धाराशिव हादरलं ! पतीकडूनच पत्नीची हत्या, ८ वर्षाच्या चिम ुकलीलाही संपवलं; घटनेनंतर स्वत:हून पोलीस ठाण्यात

दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव/प्रतिनिधी** : राज्यातील गुन्हेगारीच्या घटनांत सातत्याने वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत असून नांदेडजिल्ह्यात आठवडाभरात ४ ते ५ खूनाच्या घटना घडल्या आहेत. दुसरीकडे कौटुंबीक हिंसाचार आणि घरगुती वादावरुनही जीवघेण्या घटना घडत आहेत. धाराशिवच्या उमरगा तालुक्यातील बेरडवाडी येथील अशीच एक धक्कादायक घटना समोर आली आहे. स्वत:च्या पत्नी आणि अवघ्या ८ वर्षांच्या मुलीची वडिलांकडूनच कुऱ्हाडीने वार करून निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या घटनेनं सर्वत्र हळहळ व्यक्त होत असून बाप-लेकीच्या नात्याला काळिमा फासल्याची भावना व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे आरोपी स्वत:हून पोलिसात हजर होत गुन्ह्याची कबुली दिली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

अजित वासुदेव असे आरोपी वडिलांचे नाव असून लिंबाबाई अजित वासुदेव आणि त्यांची ८ वर्षीय मुलगी मानसीची निर्घुण हत्या करण्यात आली आहे. या हत्याकांडांच्या घटनेमागील नेम के कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. मात्र, आरोपी स्वत:हून मुरूम पोलीस ठाण्यात हजर झाला आणि त्याने केलेल्या गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीच्या कबुलीनंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा सुरू केलाय.

पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातून म ाणुसकीला काळीमा फासणारी एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. शिरूर तालुक्यातील भांबर्डे गावात एका निर्दयी आईने आपल्या अवघ्या ११ महिन्यांच्या पोटच्या म ुलाची सिमेंटच्या ओट्यावर आपटून हत्या केली. धक्कादायक म्हणजे, पुरावा नष्ट करण्यासाठी तिने चिमुरड्याचा मृतदेह बॅगेत दगड भरून विहिरीत फेकून दिला. मात्र, रांजणगाव पोलिसांनी अवघ्या काही तासांत या क्रूर घटनेचा पर्दाफाश केला आहे.

# राज्यात पेट्रोलियम पदार्थांचा पुरेसा साठा

## एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी शासनाची व्यापक उपाययोजना-अन्न नागरी पुरवठा अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यात पीएनजी जोडण्यांची संख्या २५.३६ लाखांवर पोहोचली असून एका महिन्यात ७३ हजार नवीन जोडण्या देण्यात आल्या आहेत. सीजीडी पाईपलाईनसाठी ‘ ’ देण्याचा निर्णय घेतल्याने नेटवर्क विस्ताराला गती मिळणार आहे. ज्या ठिकाणी पीएनजी नेटवर्क पोहोचलेले आहे त्याठिकाणी ग्राहकांनी त्यासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. ज्या भागांमध्ये पीएनजी पाईपलाईन टाकणे शक्य नाही त्या ठिकाणी एलपीजीचा पुरवठा पूर्ववत सुरू राहणार असून महाराष्ट्रात एलपीजी, पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिली.

मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत अपर मुख्य सचिव डिग्गीकर यांनी ही माहिती दिली. यावेळी शिधा नियंत्रक चंद्रकांत डांगे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, ‘पीआयबी’च्या महासंचालक स्मिता वत्स-शर्मा, तेल उत्पादक राज्य समन्वयक उमेश कुलकर्णी, भारत पेट्रोलियम कार्पोरेशन, कृषी संचालक सुनिल बोरकर यांच्यासह संबंधित उपस्थित होते.

**पीएनजी व सीजीडी नेटवर्कला चालना**

मध्यपूर्वेतील सध्याच्या भू-राजकीय तणावामुळे पेट्रोलियम पदार्थांच्या पुरवठा साखळीवर काही प्रमाणात दबाव निर्माण झाला असला, तरी राज्यातील पुरवठा सुरळीत असल्याचे सांगून अपर मुख्य सचिव डिग्गीकर म्हणाले की, जिथे जिथे शक्य आहे तिथे पीएनजीचा वापर वाढवण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी पाईप लाईन गॅस पुरवठा शक्य आहे. त्या ठिकाणी ३० जून पर्यंत पीएनजी बंधनकारक असून ज्या भागांमध्ये पीएनजी पाईपलाईन टाकणे शक्य नाही त्या ठिकाणा एलपीजीचा पुरवठा पूर्ववत सुरू राहणार आहे. पीएनजी कनेक्शन ज्या भागांमध्ये उपलब्ध तिथे त्याचा वापर वाढवायचा असून ग्राहकांच्या दृष्टीने विचार करता पीएनजी स्वस्त असून त्याचे देशांतर्गत उत्पादन जास्त आहे. पीएनजी नेटवर्क जिथे पोहोचले आहे तिथे तिथे ग्राहकांनी नोंदणी केली पाहिजे असे अपर मुख्य सचिव डिग्गीकर यांनी यावेळी सांगितले.

राज्यात सुमारे २४ तेल डेपोमार्फत ८,१०० पेट्रोल पंपांना सेवा पुरवली जात असून दररोज सुमारे १८,५०० केएल पेट्रोल आणि ४०,००० केएल डिझेलचे वितरण केले जात आहे. १ ते ४ एप्रिलदरम्यानची विक्रीही मागील महिन्यांच्या सरासरीशी सुसंगत असल्याने इंधनटंचाईची स्थिती नाही.

**एलपीजी पुरवठा नियंत्रणात; डिजिटल बुकिंगला प्रोत्साहन**

शिधा नियंत्रक श्री.डांगे यांनी सांगितले की, राज्यातील २३ बॉटलिंग प्लांट्समार्फत सुमारे २,२०० वितरक आणि ३.५ कोटी ग्राहकांना




सेवा दिली जाते. घरगुती एलपीजी सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून दररोज सरासरी ५.८२ लाख रिफिल वितरित केले जात आहेत. वितरण पारदर्शक करण्यासाठी डीएसी सक्तीचा करण्यात आला आहे.

ग्राहकांना डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारेच बुकिंग करण्याचे आवाहन करण्यात आले असून सध्या ९५ टक्के बुकिंग ऑनलाईन होत आहेत. न्याय्य वितरणासाठी बुकिंग अंतराल निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

**व्यावसायिक एलपीजी पुरवठा टप्प्याटप्प्याने**

व्यावसायिक एलपीजीचे वाटप टप्प्याटप्प्याने वाढवण्यात आले आहे.

अत्यावश्यक सेवा क्षेत्रांना १०० टक्के पुरवठा, तर संरक्षण, रेल्वे, पोलीस यांसारख्या विभागांना ७० टक्के पुरवठा राखण्यात आला आहे. उद्योग आणि इतर क्षेत्रांना २० टक्के ते ५० टक्के पर्यंत पुरवठा दिला जात आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार हॉटेल, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया उद्योग आदी क्षेत्रांना प्राधान्याने अतिरिक्त २० टक्के वाटप करण्यात आले आहे.

**काळाबाजार रोखण्यासाठी कडक कारवाई**

घरगुती गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी राज्यभर दक्षता पथके स्थापन करण्यात आली आहेत. १ मार्च ते ६ एप्रिल दरम्यान १४,३२९ तपासण्या छापे अंतर्गत ३,६२८ सिलिंडर जप्त करण्यात आले आहेत.

कारवाईदरम्यान २१ वाहतूक वाहने जप्त करण्यात आली असून २ गॅस कॅप्सूल/टँकर्सही ताब्यात घेण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या एलपीजी गॅसचे एकूण प्रमाण ७१,५६५.१४ किलो इतके आहे. या प्रकरणांमध्ये ५३ गुन्हे () नोंदविण्यात आले असून ३६ जणांना अटक करण्यात आली आहे. या संपूर्ण कारवाईत जप्त करण्यात आलेल्या गॅस व वाहनांची एकूण अंदाजे किंमत २ कोटी ३८ लाख ५४ हजार ४९३ रुपये इतकी आहे.


**नियंत्रण कक्ष व तक्रार निवारण यंत्रणा सक्रिय**

राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले आहेत. एलपीजी पुरवठ्यासंदर्भात तक्रारींसाठी ९७६९९१९२२१ हा व्हॉट्सअॅप क्रमांक जाहीर करण्यात आला आहे. १७ मार्च ते ६ एप्रिलदरम्यान २,४०९ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यावर कार्यवाही सुरू आहे.

### पनामामध्ये इंधन टँकरचा भीषण स्फोट, अनेक जण जखमी

वॉशिंग्टन: पनामामध्ये एका पुलाजवळ सोमवारी इंधन वाहून नेणाऱ्या टँकरमध्ये भीषण स्फोट होऊन आग लागल्याची घटना घडली. स्फोटानंतर टँकरला लागलेली आग काही वेळातच भयानक स्वरूप धारण करत पुलाच्या मुख्य भागालाही वेढून गेली. या दुर्घटनेत अनेक जण जखमी झाल्याची माहिती असून एक व्यक्ती बेपत्ता असल्याचे सांगितले जात आहे. ही घटना पनामा कालव्याच्या पॅसिफिक प्रवेशद्वाराजवळ असलेल्या ब्रिज ऑफ द अमेरिकाज परिसरात घडली. स्फोट इतका तीव्र होता की आगीच्या ज्वाळा पुलाच्या रस्त्यापर्यंत पोहोचल्या, त्यामुळे परिसरातील लोकांनी जीव वाचवण्यासाठी धावाधाव केली. स्थानिक वृत्तांनुसार, आगीमुळे सुरक्षेच्या कारणास्तव पुल काही काळासाठी बंद करण्यात आला. सार्वजनिक बांधकाम मंत्रालयाने पुल तात्पुरता बंद केल्याची पुष्टी केली आहे. अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, ''वाहनचालकांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी हा खबरदारीचा उपाय करण्यात आला असून, पुलाची संरचनात्मक स्थिती तपासण्यासाठी विशेष तांत्रिक पथके तपासणी करत आहेत.'' ब्रिज ऑफ द अमेरिकाज हा अत्यंत महत्त्वाचा रस्ता मार्ग असून त्याची लांबी सुमारे १,६५४ मीटर आहे. हा पूल पनामा कालव्याच्या पॅसिफिक प्रवेशद्वारावर स्थित असून जगातील सर्वात धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या सागरी वाहतूक मार्गांपैकी एका महत्त्वाच्या ठिकाणाच्या अगदी जवळ आहे.मध्य पूर्वेमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराणने होर्मुज सामुद्रधुनीवर निर्बंध लावल्यानंतर अमेरिकेतून जाणाऱ्या कच्च्या तेलाच्या काही खेपा पनामा कालवामार्गे आशियाकडे वळवण्यात आल्या होत्या.

## एचपीव्ही लसीकरणाविषयी जागरूकता वाढविण्यासाठी कार्यशाळा संपन्न





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** महिलांमध्ये वाढत्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या ( ) प्रमाणावर नियंत्रण मिळवण्यासाठी एचपीव्ही संक्रमणाविषयी जिल्ह्यात जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून बुलढाणा येथील अर्बन हॉल, कारंजा चौक येथे महिला डॉक्टरांसाठी एचपीव्ही लसीकरण विषयावर एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली.

कार्यशाळेत तज्ज्ञ डॉक्टरांनी एचपीव्ही विषाणूचा प्रसार, त्याचे दुष्परिणाम तसेच एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विशेषतः किशोरवयीन मुलींना योग्य वयात लसीकरण केल्यास गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून मोठ्या प्रमाणात संरक्षण मिळू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यशाळेदरम्यान सहभागी महिला डॉक्टरांनी आपले अनुभव मांडले. शंका-निरसन सत्र घेण्यात आले असून, आधुनिक लसीकरण पद्धतींवरही सखोल चर्चा करण्यात आली. ग्रामीण व शहरी भागात एचपीव्ही लसीकरणाचा प्रसार वाढवण्यासाठी आरोग्य यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली.

कार्यशाळेचे आयोजन तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, बुलढाणा व निमा वुमन्स फोरम, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकारी रायपूर डॉ. शिल्पा खराटे यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे नियोजन डॉ. वैशाली पडघाण व निमा वुमन्स फोरम यांनी केले. या कार्यशाळेस बुलढाणा तालुक्यातील अनेक महिला डॉक्टर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी एचपीव्ही लसीकरणाबाबत व्यापक जनजागृती करण्याचा संकल्प केला.

## अमिताभ बच्चननं कल्की २चं शूटिंग केलं सुरू, फोटो व्हायरल

दैनिक आपला विदर्भ

हैदराबाद : हिंदी चित्रपटसृष्टीतील शहेनशाह अमिताभ बच्चन यांनी नागा अश्विनच्या कल्की २८९८ एडी चित्रपटात अश्वत्थामाची भूमिका साकारून प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. आता या चित्रपटाच्या सीक्वेलवर काम सुरू आहे. अमिताभ बच्चन आणि कमल हासन कल्की २च्या सेटवर पुन्हा एकत्र आले आहेत. या चित्रपटाच्या सीक्वेलची अधिकृत सुरुवात हैदराबादमध्ये झाली आहे. अमिताभ बच्चन आणि कमल हासन कल्की २च्या सेटवर पुन्हा एकत्र दिसले आहेत. या दोन्ही दिग्गजांना एकत्र पाहून सोशल मीडियावर खळबळ उडाली आहे. अलीकडेच, बिग बी यांनी एक पोस्ट शेअर केली आहे, ज्यामध्ये त्यांनी माहिती दिली आहे की ते या रविवारी हैदराबादमध्ये शूटिंग करत असल्याने त्यांच्या चाहत्यांना भेटू शकणार नाहीत. त्यांनी कल्की २च्या सेटवरील अनेक फोटो शेअर केले आहेत, ज्यामध्ये ते अश्वत्थामाची भूमिका साकारताना दिसत आहेत.

कल्की २च्या सेटवरील बिग बींचे फोटो : अमिताभ बच्चन यांनी अलीकडेच त्यांच्या ब्लॉगवर हैदराबादमधील कल्की २च्या सेटवरील काही पडद्यामागील फोटो शेअर केले आहेत. फोटोंमध्ये, अमिताभ कमल हासनला मीठी मारताना दिसत आहेत, ज्यांच्यामध्ये त्याचे सीक्वेलमध्ये सीन्स आहेत. कमल हासन आणि अमिताभ दोघेही कल्की २८९८ एडी या पहिल्या चित्रपटाचा भाग असले तरी, त्यांचे एकत्र फारसे सीन नव्हते. हे फोटो शेअर करताना बिग बींनी त्यांच्या ब्लॉगवर लिहिलं, मी त्यांना सांगितलं होतं की, मी या रविवारी येऊ शकणार नाही कारण, मी हैदराबादमध्ये शूटिंग करत होतो. पण तरीही ते आले. खात्री करण्यासाठी. हा गोंडस माणूसही. पण माफ करा. आधी काम करा, नंतर आराम करा.

# बुलढाणा जिल्ह्यात जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील क्षेत्रीय प्रशिक्षणास प्रारंभ

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** जनगणना २०२७ च्या पूर्वतयारीचा भाग म्हणून, पहिल्या टप्प्यातील क्षेत्रीय प्रशिक्षकांचे (फिल्ड ट्रेनर) जिल्हास्तरीय प्रशिक्षण जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात उत्साहात सुरू झाले आहे. हे प्रशिक्षण ११ एप्रिल २०२६ पर्यंत चालणार असून, याद्वारे आगामी जनगणनेच्या तांत्रिक आणि क्षेत्रीय कामाची पायाभरणी केली जात आहे.

या पाच दिवशीय प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ सोमवार, ६ एप्रिल रोजी करण्यात आला. यावेळी





बुलढाण्याचे जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासोबतच जनगणना संचालनालयाच्या कार्यालयातील सांख्यिकी अन्वेषक (ग्रेड २) पवन घोडे आणि मयूर पवार यांनी मार्गदर्शन केले.

यावेळच्या जनगणनेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही प्रक्रिया डिजिटल स्वरूपात पार पडणार आहे. प्रशिक्षणादरम्यान क्षेत्रीय प्रशिक्षकांना डिजिटल जनगणनेची माहिती, मोबाईल ॲपचा वापर आणि माहिती संकलित करण्याच्या आधुनिक पद्धतींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण दोन सत्रांमध्ये आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये मास्टर ट्रेनर म्हणून संजय खडसे (उपविभागीय अधिकारी, सिंदखेड राजा) व डॉ. रामेश्वर पुरी (उपविभागीय अधिकारी, खामगाव) हे अधिकारी क्षेत्रीय प्रशिक्षकांना सखोल प्रशिक्षण देत आहेत. या जिल्हास्तरीय प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील सर्व नियुक्त क्षेत्रीय प्रशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे प्रशिक्षित फिल्ड ट्रेनर पुढे जाऊन प्रत्यक्ष जनगणनेच्या कामात सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.



# अपूर्ण जलजीवन योजना 'पूर्ण' दाखवण्याचा प्रकार उघड!

## अधिकाऱ्यावर कारवाईसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी : मेहकर तालुक्यातील नागपूर येथे जल जीवन मिशनच्या नावाखाली कोट्यवधींच्या निधीची उधळपट्टी झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. ''हर घर नल, हर घर जल'' या योजनेचा फक्त कागदोपत्री गाजावाजा करून प्रत्यक्षात गावकऱ्यांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत असल्याने संतापाचा ज्वालामुखी उसळला आहे. सुमारे ₹१ कोटी २५ लाख ३४ हजारांचा निधी मंजूर झाल्यानंतरही गावात पाण्याचा थेंब नाही, ही बाब प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर थेट प्रश्नचिन्ह उभी करत आहे. कागदावर काम पूर्ण, पण प्रत्यक्षात योजना ठप्प हा प्रकार म्हणजे सरळसरळ जनतेची फसवणूक असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.**



पाणी कुठे गेलं? हा थेट सवाल आता नागरिक प्रशासनाला विचारत आहेत. महिला आणि नागरिकांना अजूनही पाण्यासाठी मैलोनमैल भटकंती करावी लागत आहे, तर कागदावर मात्र सर्व काही सुरळीत असल्याचे दाखवले जात आहे. या प्रकरणात शासकीय निधीचा अपहार, खोटी नोंद, जाणूनबुजून दिशाभूल आणि कर्तव्यच्युती यांसारखे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करून सखोल चौकशी करण्याची जोरदार मागणी होत आहे. ग्रामस्थांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, ''जर तातडीने कारवाई झाली नाही तर आंदोलनाचा मार्ग स्वीकारला जाईल. तसेच, तांत्रिक ऑडिट करून संपूर्ण कामाची चौकशी करण्यात यावी आणि

दोषींना तात्काळ निलंबित करावे, अशी मागणीही जोर धरत आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणामुळे प्रशासनाची विश्वासार्हता धोक्यात आली असून, आता प्रशासन कारवाई करते की प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



### आमसभेत 'सर्व ठीक'चा दावा, प्रत्यक्षात काम अपूर्ण!

दि. ३१ मार्च रोजी झालेल्या वार्षिक आमसभेत आमदार सिद्धार्थ खरात, अनेक अधिकारी, विविध पक्षांचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. या बैठकीत ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपविभागीय अभियंता धाबे यांनी गावातील जल जीवन मिशन योजना पूर्ण झाल्याची घोषणा केली. तसेच, ''गावात पाणीपुरवठा सुरळीत सुरू आहे,'' असेही त्यांनी सर्वांसमोर स्पष्टपणे सांगितले.

मात्र, या दाव्याच्या पूर्णपणे विरुद्ध वास्तव समोर येत आहे. पाण्याच्या टाकीचे काम अद्याप अपूर्ण गावातील पाइपलाईनमध्ये अनेक ठिकाणी लिकेज विहिरीवर लाईनची कोणतीही योग्य व्यवस्था नाही अशा अनेक त्रुटी असतानाही योजना पूर्ण झाल्याचे सांगून लोकप्रतिनिधींना खोटी माहिती देण्यात आल्याचा गंभीर आरोप होत आहे. यामुळे केवळ नागरिकांचीच नव्हे, तर लोकप्रतिनिधींचीही दिशाभूल करण्यात आल्याची चर्चा जोर धरत आहे.

### तक्रारी दाखल.. आता चौकशी की फाईल दडपशाही?

या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी व्हावी यासाठी नागापूर वाशी यांनी जिल्हाधिकारी बुलढाणा, उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी आणि ग्रामपंचायत प्रशासनाकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे. मात्र आता सर्वांचे लक्ष एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे लागले आहे या तक्रारींवर खरोखरच चौकशी होणार का? की पुन्हा एकदा फाईल कचराकुंडीत जाईल? प्रशासन या प्रकरणावर ठोस कारवाई करून सत्य बाहेर आणणार की हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होणार, याबाबत नागरिकांमध्ये संशयाचे वातावरण आहे. त्यामुळे आता प्रशासनाची भूमिका निर्णायक ठरणार आहे. की पुन्हा नागापूर हे तहानलेलेच राहणार आहे हे पाहणं मात्र आता तेवढेच महत्त्वाचे ठरणार आहे तूर्तास एवढेच

## वृत्तविशेष...

### सागरी सुरक्षेसाठी आणखी १0 ड्रोन खरेदी करा!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्राच्या विस्तीर्ण किनारपट्टीची सुरक्षा अधिक सक्षम करण्यासाठी आणि अनधिकृत मासेमारीला पूर्णपणे लगाम घालण्यासाठी आणखी १० ड्रोन खरेदी करा, असे निर्देश मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी मंगळवारी दिले.

मंत्रालयात आयोजित मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. सागरी सीमांच्या सर्वेक्षणासाठी ड्रोन हा सर्वात प्रभावी पर्याय ठरत आहे. त्यामुळे महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ च्या कठोर अंमलबजावणीसाठी गस्ती नौकांसोबतच या ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे.

दरम्यान, सागरी सुरक्षेचा आढावा घेताना मंत्री राणे यांनी किनारपट्टीवरील ९१ अतिसंवेदनशील 'लँडिंग पॉईंट्स'वर विशेष लक्ष केंद्रित करण्याच्या सूचना दिल्या. या केंद्रांवर 'महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळा'मार्फत सशस्त्र सुरक्षा रक्षक आणि पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात येणार आहे. तसेच, 'प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजने'अंतर्गत 'सागर मित्र' नेमणुकीच्या प्रक्रियेला गती देण्याचे आदेशही यावेळी देण्यात आले.

राज्यात कोळंबी पालनाला प्रोत्साहन देण्यासाठी 'भूपट्टा धोरण' आणि भूवाटपाचा आराखडा तयार करण्यावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. कोळंबी पालन विकासासाठी प्राधान्यक्रमाचा कार्यक्रम निश्चित करून त्याद्वारे मत्स्योद्योगाला व्यावसायिक उभारी देण्याचा सरकारचा मानस आहे. या बैठकीला 'सिबा' कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.

मत्स्यव्यवसाय विभागाच्या कामाचा व्याप पाहता, नवीन आकृतीबंधानुसार तातडीने कर्मचारी भरती प्रक्रिया राबवण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी आणि नव्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी रिक्त पदे भरण्याचे निर्देश मंत्री नितेश राणे यांनी दिले. या बैठकीला मत्स्यव्यवसाय विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. रामास्वामी एन., आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### एअर इंडियाची भाडेवाढ

नवी दिल्ली: टाटा ग्रुपच्या मालकीच्या एअर इंडियाने प्रवाशांना मोठा धक्का दिला आहे. जर तुम्हीही एअर इंडियाने प्रवास करण्याचा विचार करत असाल, तर आता तुमच्या भाड्यात वाढ होऊ शकते. कंपनीने ८ एप्रिलपासून आपल्या इंधन अधिभाराच्या रचनेत बदल जाहीर केला आहे, ज्यामुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय दोन्ही मार्गांवरील तिकिटे अधिक महाग होणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, ७ एप्रिल रोजी जारी केलेल्या एका निवेदनात एअर इंडियाने म्हटले आहे की, जागतिक स्तरावर जेट इंधनाच्या (एटीएफ) किमतीत झालेल्या मोठ्या वाढीमुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

### विद्यार्थ्याचा मृत्यू

पुणे : पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात घडलेल्या एका दुर्दैवी अपघाताने खळबळ उडाली आहे. बास्केटबॉल खेळताना लोखंडी स्टॅन्ड कोसळून एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली असून, या प्रकरणामुळे सुरक्षेच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# टिव्ही अँड डिजिटल मीडियाच्या जर्नालिस्ट असोसिएशनच्या बुलढाणा तालुका अध्यक्षपदी दिपक मोरे

## बुलढाणा येथे झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीमध्ये घेण्यात आला निर्णय

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा। प्रतिनिधी** : पत्रकारांच्या हितासाठी सदैव लढा देणाऱ्या टिव्ही अँड डिजिटल मीडियाच्या जर्नालिस्ट असोसिएशनच्या बुलढाणा तालुकाध्यक्षपदी दीपक मोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बुलढाणा येथे पार पडलेल्या संघटनेच्या बैठकीमध्ये सर्वांमध्ये हा निर्णय घेण्यात आला

टिव्ही अँड डिजिटल मीडियाच्या जर्नालिस्ट असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष राहुल पहुरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत बुलढाणा येथील स्थानिक विश्राम भवनात संघटनेचे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीमध्ये विविध विषयांवर चर्चा झाल्यानंतर बुलढाणा जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये तालुकाध्यक्ष नियुक्त करण्याचा प्रस्ताव संघटनेचे जिल्हाध्यक्ष फहीम देशमुख यांनी मांडल्यानंतर सर्वांनी या विषयाला तात्काळ मान्यता दिली. त्यानंतर बुलढाणा येथून या विषयाची सुरुवात करण्यात आली यामध्ये बुलढाणा येथील पत्रकार दीपक मोरे यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब झाले. यानंतर जिल्हाध्यक्ष फहीम देशमुख यांनी त्यांना तालुकाध्यक्ष म्हणून घोषित केले. यावेळी मोरे यांचा सर्व सन्माननीय पदाधिकाऱ्यांच्या हस्ते स्वागता सत्कार करण्यात आले. संघटनेला बळकटी येण्यासाठी विविध उपक्रम आणि उपाययोजना करून पत्रकारांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यासाठी आपण सदैव लढा देणार असल्याची ग्वाही यावेळी नवनियुक्त तालुकाध्यक्ष दीपक मोरे यांनी दिली.

या बैठकीला संस्थापक अध्यक्ष राहुल पहूरकर, जिल्हाध्यक्ष फहीम देशमुख, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य संजय जाधव,युवराज वाघ,संदीप शुक्ला, माजी जिल्हाध्यक्ष अमोल गावंडे, वसीम शेख,प्रफुल खंडारे, संदीप वानखडे, दिपक मोरे, किशोर खंडारे, निलेश राऊत, संतोष करे आदींची यावेळी उपस्थिती होती. बैठकीचे संचालन संघटनेचे सचिव प्रफुल्ल खंडारे यांनी तर आभार अमोल गावंडे यांनी मानले.

# शालेय सहलींतून एसटीच्या तिजोरीत १२७ कोटींची भर

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या राज्य म ार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यातील 'लाल परी'ने शालेय सहलींच्या माध्यमातून यंदा यशाचे नवे शिखर गाठले आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात एसटीने २५ हजार ५५८ बस फेऱ्यांच्या माध्यमातून तब्बल १२७ कोटी १८ लाख रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळविले असून, मागील वर्षाच्या तुलनेत महसुलात ३३ कोटी २९ लाखांची मोठी वाढ झाली आहे. सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवासासाठी आजही 'एसटी'च विद्यार्थ्यांची पहिली पसंती असल्याचे यातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी यासंदर्भात माहिती दिली. ते म्हणाले की, शालेय सहल हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनातील आनंदाचा आणि संस्मरणीय क्षण असतो. ऐतिहासिक, धार्मिक व पर्यटन स्थळांची ही मुशाफिरी सुरक्षित असावी, याकडे शासनाचा कटाक्ष आहे. या शैक्षणिक वर्षात लाखो विद्यार्थ्यांनी एसटीच्या माध्यमातून सुखकर प्रवास केला असून, सुरक्षिततेच्या बाबतीत एसटीला पर्याय नाही, यावर या उत्पन्नाने शिक्कामोर्तब केले आहे.

शाळा आणि महाविद्यालयांनी एसटीच्या माध्यमातून सहलींचे आयोजन केल्यास विद्यार्थ्यांना प्रवासी भाड्यात शासनाकडून ५० टक्के सवलत दिली जाते. यामुळेच विशेषत: ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि शैक्षणिक संस्थांना एसटीचा आधार मोठा वाटतो. खासगी ट्रॅव्हल्सच्या तुलनेत माफक दर आणि विश्वासार्हता ही एसटीची बलस्थाने ठरली आहेत.

नव्या बसेसमुळे प्रवास झाला सुखकर

यंदा बहुतांश सहलींसाठी महामंडळाने नव्या आणि अद्ययावत बसेस उपलब्ध करून दिल्या होत्या. यामुळे विद्यार्थ्यांचा प्रवास केवळ सुरक्षितच नाही, तर अत्यंत आरामदायी आणि समाधानकारक झाला. राज्यभरातून मिळालेल्या २५ हजार ५५८ बस फेऱ्यांच्या मागणीवरून एसटीवरील जनतेचा विश्वास अधोरेखित झाला आहे.

# 'चिल्ड्रेन बँक' नोटांद्वारे फसवणूक करणारी टोळी जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई; २.0१ लाखांचा मुद्देमाल जप्त, ४ आरोपी अटकेत

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** सोशल मीडियाच्या माध्यमातून कमी पैशांत जास्त रकमेच्या नोटा देण्याचे आमिष दाखवून सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश करत मलकापूर येथे धडक कारवाई केली. या कारवाईत ४ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्या ताब्यातून २ लाख १ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जिल्ह्यात गेल्या काही दिवसांत अशा प्रकारच्या फसवणुकीच्या घटना वाढत असल्याने पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी याची गंभीर दखल घेत संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनिल अंबुलकर यांनी आपल्या अधिनस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची विशेष पथके तयार करून कारवाई सुरू केली.

दि. ७ एप्रिल रोजी पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, मलकापूर शहरात काही इसम सोशल मीडियावर १ लाख रुपयांच्या बदल्यात १० लाख रुपयांच्या नोटा देण्याचे आमिष दाखवत नागरिकांची फसवणूक करत आहेत. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक सुनिल अंबुलकर यांच्या नेतृत्वाखाली पथकाने मलकापूर शहरात सापळा रचून कारवाई केली.

या कारवाईत आरोपी

अमोल रमेश गोरे (वय २५, रा. मलकापूर), भारत मधुकर वानखेडे (वय २५, रा. मलकापूर), अविनाश सुनिल तायडे (वय २२, रा. मलकापूर) आणि चेतन गुलाबराव पाटील (वय २५, रा. महालखेडा, ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव) यांना अटक करण्यात आली.

कारवाईदरम्यान आरोपींनी पोलिसांवर हल्ला करून अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यात काही पोलीस अधिकारी व अंमलदार किरकोळ जखमी झाले. आरोपींकडून जप्त मुद्देमालामध्ये १,५०० रुपये रोख, 'चिल्ड्रेन बँक' असे लिहिलेल्या ९ लाख रुपयांच्या बनावट नोटा (किंमत शून्य), २ लोखंडी चाकू, ६ मोबाईल फोन (किंमत अंदाजे १ लाख रुपये) तसेच २ ज्युपिटर मोपेड (किंमत अंदाजे १ लाख रुपये) असा एकूण २,०१,७०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक अविनाश जायभाये (स्था. गु.शा. बुलढाणा) यांच्या फिर्यादीवरून मलकापूर शहर पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक गणेश गिरी (पो.स्टे. मलकापूर शहर) करत आहेत. न्यायालयाच्या आदेशानुसार आरोपींना पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक श्रेणिक लोडा (खामगाव), अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड (बुलढाणा) तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी आनंद महाजन (मलकापूर) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनिल अंबुलकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक अविनाश जायभाये, पोहेकॉ. दिपक लेकुरवाळे, शेख चाँद, गणेश पाटील, पो.कॉ. गजानन गोरले (स्था. गु.शा. बुलढाणा) तसेच पोहेकॉ. राजू आडवे (तांत्रिक विश्लेषण विभाग, बुलढाणा) यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली.

